# भारताचा नेक्स्ट जनरेशन प्रोग्रॅमॅटिक टीव्ही कालखंडात प्रवेश

**मुंबई, दि.३१ :** बेंगळुरु, ३० मार्च २०१६: जागतिक टेलिव्हिजन क्षेत्रात पहिल्यांदाच श्युअर व्हेव्ज मिडिया टेक या प्रसिद्धीमाध्यमांमधील एककेंद्राभिमुखतेची सुरुवात करणाऱ्या कंपनीने त्यांच्या 'स्कायनेट' या नवी समीकरणे रचणाऱ्या प्रोग्रॅमॅटिक टेलिव्हिजन अॅडव्हर्टायझिंग बाजारपेठेची आज घोषणा केली. श्युअर व्हेव्जच्या या नव्या उत्पादनामुळे टेलिव्हिजन जाहिरातींच्या जगात आमुलाग्र बदल घडून येतील. डिजिटल मिडियामध्ये प्रोग्रॅमॅटिक जाहिराती प्रामुख्याने वापरल्या जातात. शिवाय, त्या अतिशय परिणामकारक आणि विश्वसनीयही ठरल्या आहेत. मात्र, आजवर टेलिव्हिजन क्षेत्रात एण्ड-टू-एण्ड पद्धतीने त्या यशस्वीरित्या वापरल्या गेल्या नाहीत.